# अमरावती ग्रामिण जिल्हा पोलीस दल

## पोलीस शिपाई /चालक पोलीस शिपाई सन २०२२-२०२३ मधील

*अमरावती ग्रामिण जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई /चालक पोलीस शिपाई पदाची भरती दि.१९/०६/२०२४ पासुन सुरू होत आहे. त्या अनुषंगाने*

## -: उमेदवारांकरीता सर्वसाधारण सुचना :-

१) सर्व उमेदवारांनी भरती करिता त्यांना दिलेल्या नियोजीत दिवशी **जोग स्टेडीयम,कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती शहर मागे,अमरावती** येथे **सकाळी ०४.३० वा.** न चुकता सर्व मुळकागदपत्रांसह हजर रहावे.

२) सर्वप्रथम पोलीस शिपाई भरती करीता आलेल्या उमेदवारांनी प्रवेश पत्र व ओळख पटविण्याकरीता आपले आधारकार्ड/पॅनकार्ड/ड्रायव्हींग लायसन/ईलेक्शन कार्ड यापैकी कोणतेही ज्यावरील उमेदवारांचे छायाचित्र (फोटो) अद्यावत असेल असे एक ओळखपत्र सोबत ठेवावे.

३) उमेदवारास मोबाईल, स्मार्ट वॉच अथवा इतर इलेक्ट्रॉनीक्स डिव्हाईस/गॅझेट वापरण्यास प्रतिबंध असल्याने कोणीही वरील इलेक्ट्रॉनीक्स वस्तूंचा वापर करणार नाही किंवा अशा वस्तु मैदानावर आणणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) त्यानंतर उमेवारांनी मुख्य प्रवेशव्दारातुन आतमध्य प्रवेश केल्यानंतर सर्वप्रथम त्यांना भरती प्रक्रिये बाबत थोडक्यात माहीती देण्यात येईल.

५) त्यानंतर उमेदवारांची ओळख पटवुन त्यांची हजेरी घेण्यात येईल, त्याकरिता उमेदवारांना त्यांचे प्रवेश पत्र,ऑनलाईन आवेदन अर्ज,२ पासपोर्ट फोटो, तसचे मुद्दा क्रं.२ मध्ये नमुद प्रमाणे ओळख पटविण्या करिता ०१ ओळखपत्रा सोबत ठेवावे.

६) त्यानंतर उमेदवाराची हजेरी झाल्यानंतर आपल्या शैक्षणिक कागदपत्राची पडताळणी करण्यात येणार आहे. त्याकरीता उमेदवाराने समोर लावण्यात आलेल्या आपले प्रवर्गाच्या सुचना फलकामध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक कागदपत्र व इतर प्रमाणपत्राचे मुळ व छायांकीत प्रत (Self Attested करून) क्रमानुसार लावावे.

७) त्यानंतर उमेदवाराकडे जर बॅग/पिशवी ई. असेल तर ते ठेवण्याकरीता नेमुन दिलेल्या ठिकाणी उमेदवारास जाता येईल.

८) त्यानंतर कागदपत्र तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची उंची व छाती (पुरूष) मोजमाप करण्यात येईल. अपात्र उमेदवारास मैदानाबाहेर पाठविण्यात येईल.

९) त्यानंतर उंची व छाती (पुरूष) मोजमाप मध्ये पात्र उमेदवारांना चेस्ट क्रमांक (छाती क्रमांक) वाटप करण्यात येईल.

१०) त्यानंतर उमेदवारांचे बायोमॅट्रीक मोजमाप, थंम (अंगठा/चेहरा (फेस) ई.घेण्यात येईल.

११) त्यानंतर उमेदवारास मैदानी चाचणी साठी पाठविण्यात येईल,मैदानी चाचणी संपल्यावर उमेदवारास चेस्ट क्रमांक नियोजीत ठिकाणी जमा करणे बंधनकारक आहे. त्यांनंतरच उमेदवारास मैदाना बाहेर पाठविण्यात येईल.

१२) पोलीस भरती प्रक्रीयेच्या वेळी उमेदवारास कोणत्याही शारीरिक इजा अथवा नुकसान झाल्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. उमेदवारांनी त्यांचे क्षमतेप्रमाणे व स्वत:ची काळजी घेवून मैदानी चाचणी पार पाडावी.

१३) पोलीस भरतीमध्ये कोणताही व्यक्ती आपणास संपर्क साधून पैशाच्या मोबदल्यात भरतीत निवड निश्चित करण्याचे प्रलोभण दाखवित असल्यास उमेदवाराने त्यांच्या प्रलोभणास बळी पडू नये.

१४) भरती संदर्भात कोणत्याही बाबतीत काही तक्रार /शंका असल्यास किंवा भरती प्रक्रीयेत गैरप्रकार होत असल्याचे दिसून आल्यास ही बाब वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी.

१५) उमेदवार भरती प्रक्रीयेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करतांना आढळल्यास त्यास भरती प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

***धन्यवाद***